**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**

**मा.स्थायी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - २६/०४/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक २६/०४/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.दंडवते-सहा.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.दुधेकर–सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.खोसे,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशा.अधिकारी (शिक्षण मंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे,मा.इंगळे,मा.थोरात,मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड, मा.पाटील -कार्यकारी अभियंता, मा.बुरसे-मुख्य अभियंता (पीएमपीएमएल), मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**मा.सभापती -** सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने बुधवार दिनांक ०३/०५/२०१७ रोजी दुपारी १.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**

**मा.स्थायी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६**

**(सभावृत्तांत)**

दिनांक – ०३/०५/२०१७ वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२६/४/२०१७ ची तहकूब सभा बुधवार,दिनांक ०३/०५/२०१७ रोजी दुपारी १.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे–सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर,मा.इंदलकर,मा.लोणकर-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे, मा.थोरात,मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले, मा.पाटील,मा.घुबे,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता,मा.खोत-प्रशा.अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.बुरसे (मुख्य अभियंता,पीएमपीएमएल), मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

(नवनियुक्त महापालिका आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांचे स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आणि त्यानंतर मा.आयुक्त यांनी त्यांचा मा.सभागृहास परिचय करुन दिला.)

ठराव क्रमांक – २५७ विषय क्रमांक – १
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६१/२०१७ दि.१५/३/२०१७
विषय - सेक्टर क्र. 10 व से.क्र.12 टाकी वरून पाणीपुरवठा होणा-या भागात वितरण नलिका टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** पाणीपुरवठा करणारी वितरण नलिका आणि जलनिःसारण नलिका याचे नकाशे उपलब्ध असले पाहीजेत. २४ बाय ७ या योजनेतूनच हे काम पूर्ण करणे अपेक्षित आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५८ विषय क्रमांक – २
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/१६५/२०१७ दि.१४/०३/२०१७
विषय - महापालिका सार्वत्रिक निवडणूक–2017 करीता व्हिडीयो चित्रीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** विषयाची माहिती देणेकरिता संबंधित अधिकारी सभेस उपस्थित नसल्यामुळे पुढील सभेपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५९ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१०११/२०१७ दि.१५/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पुलांचे Condition Surveywith NDT करुन अहवाल सादर करण्यासाठी मे.सी.व्ही.कांड कन्स.प्रा.लि. यांना हॅरीस ब्रिज (जुना) यासाठी र.रु. ४,००,०००/- + सेवाकर इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च जे.एन.एन.यू.आर.एम. या लेखाशिर्षाखालील मुंबई पुणे रस्ता दापोडी हॅरीस ब्रिज येथे उड्डाणपुल बांधणे या अंदाजपत्रकीय पान क्र. ६२३ अ.क्र. ९ यावर करता येईल त्यासाठी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात र.रु. ६.५० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सदरचे काम तातडीचे व विशेष स्वरुपाचे असल्याने महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील कलम ५(२) (२) नुसार थेट पध्दतीने करारनामा 'न' करता या क्षेत्रातील तज्ञ कन्स्लटंट मे.सी.व्ही. कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६० विषय क्रमांक – ४

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/६३/२०१७ दि.२३/०३/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ४१ स्मशानभूमी/दफनभूमीत ठेकेदारामार्फत काळजीवाहक पुरविणेचे कामकाजास मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** हा विषय मुदतवाढीचा आहे. आपणास यापूर्वी जे आदेश/सूचना केल्या आहेत, त्याप्रमाणे पुढील सभेपर्यंत कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा हा विषय फेटाळला जाईल. पुढील सभेपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६१ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/१२३/२०१७ दि.२१/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.सहव्यवस्थापकीय संचालक पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ./४४४/ दि.२६/०९/२०१६ अन्वये सन २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या विविध प्रकारच्या सवलतीच्या दरातील पासेसपोटी र.रू.२१,५०,११,२१४/-ची मागणी केली असुन त्यापोटी आगावू स्वरूपात र.रू.१८,००,००,०००/-मा.स्थायी समिती ठराव क्रं.१५९४८ दि.०५/०४/२०१६ चे ठरावा प्रमाणे यापुर्वीच अदा करण्यात आली आहे. मा.आयुक्त यांचे कडील दिनांक १८/३/२०१६ चे मान्य प्रस्तावा नुसार र.रू.२,३७,८०,८८७/-विविध प्रकारचे पासेस पोटी मा.स्थायी समितीचे उमेद मान्यतेवर समायोजन करण्याच्या अटीस अधीन राहून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** पीएमपीएमएलचा विषय असेलतर नगरसेवक सभागृहात प्रश्न/समस्या मांडत असतात. परंतू आपल्या प्रश्नांसंदर्भात पीएमपीएमएलच्या बैठकीत उहापोह होत नाही, आपल्या समस्यांना योग्य प्लॅटफॉर्म मिळत नाही. याकरिता संचालक मंडळ, पीएमपीएमएल यांचेबरोबर सर्व पदाधिका-यांची बैठक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आयोजित करण्यात यावी.

मा.आयुक्त यांनी मा.कार्याध्यक्ष, पीएमपीएमएल यांना तसे पत्र द्यावे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत बैठक घेणे त्यांना बंधनकारक करावे. पीएमपीएमएलचा विषय सभेपुढे आल्यास माहिती देण्याकरीता विषयाशी संबंधित अधिका-यांना पाठवावे. सन २०१५-१६ करिता पीएमपीएमएल यांनी र.रू.२१,५०,११,२१४/-ची मागणी केली आहे. या संदर्भातील

धोरण स्थायी समितीपुढे आणावे. अंध,अपंग, ज्येष्ठ नागरिक यांना फ्रि पास देण्यास आमची हरकत नाही. परंतू पदाधिका-यांकडील सेवक व इतर मंडळी यांना जे फ्रि पास दिले जातात, त्या संदर्भात नवीन धोरण तयार करुन ते मा.स्थायी समितीसमोर सादर करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६२ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – उद्यान

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/७२/२०१७ दि.९/१/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.२३/२०१६-१७ इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उद्याने सुशोभिकरणासाठी रोपे खरेदी व नुतणीकरण करणेकामी मे.अथर्व स्वयं.आद्योगिक सेवा.सह.संस्था मर्या. यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर.रू.१,९२,९३५/- (अक्षरी र.रू.एक लाख ब्यान्नव हजार नऊशे पस्तीस फक्त) अंदाजपत्रकिय दरानुसार या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/६/कावि/७१/२०१७ दि.९/०१/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६३ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/१२१/२०१७ दि.३/४/२०१७

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था/बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था/मजूर सहकारी संस्था यांचेकडून खाजगीकरणाद्वारे किमान वेतन दराने उपलब्ध केलेल्या कामगारांचे कामास मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** कामगारांचे ईएसआय/पीएफसंदर्भात ठेकेदारांचा पीएफ नंबर अपलोड करुन घ्यावा. ज्या ज्या विभागांत तात्पुरती कामगार भरती केली आहे, त्या विभागांना एक परिपत्रक द्यावे. ६ प्रभागांकरीता ६ संस्था याबाबतीत लक्ष घालावे. निविदा प्रक्रिया लवकरात लवकर राबवावी. जास्तीत जास्त निविदाधारक आले पाहीजेत अशी अपेक्षा आहे. पुढील सभेपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६४ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/६७/२०१७ दि.३/३/२०१७
विषय –पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३६ पैकी नजीकचे ०२ स्मशानभूमी/ दफनभूमीसाठी ठेकेदार पद्धतीने २४ तासासाठी ०७ काळजीवाहक प्रती दिन पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६५ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/९५४/२०१७ दि.२/१/२०१७
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागास आवश्यक ४.५ घन मिटर क्षमता बीन्स कंटेनर म.न.पा.ड्रॉईंग/डिझाईन/स्पेशिफिकेशन/नमुन्या प्रमाणे खरेदीबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६६ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/९/२०१७ दि.११/१/२०१७
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मतदार जनजागृतीचे कार्यक्रमासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६७ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – लेखा
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/२२/कावि/१२/२०१७ दि.१०/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वृक्ष संवर्धन विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१७-१८ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. मा.वृक्ष प्राधिकरणांने सभा ठराव क्र.१४ दिनांक २८/११/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सन २०१६-२०१७ च्या ६ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ६ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कम नमूद केलेल्या आहेत. सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१७,६८,९१,०००/- चे व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१७,६१,५६,०००/- यास मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**निर्णय-** दरवर्षी झाडांच्या पिंज-यांचे डिजाईन बदलण्यात यावे. महापालिकेने वृक्षारोपण केलेल्या मोठमोठ्या झाडांच्या संगोपन/संरक्षणासाठी ही झाडे शहरातील नागरीक/बचत गट/महिला मंडळे/शाळा दत्तक घेण्याची योजना कार्यान्वित करावी. बिल्डर पैसे भरतात पण झाडे लावतात का नाहीत, किती झाडे लावतात, काय प्रमाणात लावतात यातील कायदेशीर बाबींची तपासणी करावी. याबाबतीत व्हिजिट करण्यात येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६८ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/१०६/२०१७ दि.१४/०३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मनपाच्या विद्युत विभागासाठी विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदीबाबत ई निविदा सुचना क्र.28/2016-17 अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.शक्ती फिक्सर्स प्रा.लि. यांचे दर पत्रकातील बाब क्र.1 या साहित्याचे दर र.रू.5,01,000/- मे. हायटेक इलेक्ट्रिकल्स यांचे बाब क्र.5 व 6 या साहित्याचे दर र.रु.15,41,500/- व मे.ब्राईटशाईन असोसिएटस यांचे बाब क्र.3 व 4 या साहित्याचे दर र.रु.2,13,600/- व मे.सुरज स्विचगेअर कंपनी यांचे बाब क्र.2 व 7 च्या साहित्याचे दर र.रु.5,20,800/- असे एकूण 1 ते 7 बाबींचे दर र.रु.27,76,900/- चे दर सार्वत्रिक निवडणूक 2017 चे तातडीचे कामाचे अनुषंगाने स्विकृतीस मा.आयुक्त सो. यांनी दि.25/01/2017 अन्वये मान्यता दिलेली आहे. यानुसार सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केला आहे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व र.रु.27,76,900/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६९ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/१६६/२०१७ दि.१४/३/२०१७
विषय - सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता आवश्यक छपाई साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७० विषय क्रमांक – १४
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/२३०/२०१७ दि.६/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे करआकारणी व करसंकलन विभागास सन 2017-18 या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक मनपा नमुन्याप्रमाणे प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले छपाई करुन खरेदीबाबत मध्यवर्ती भांडार विभागाने ई निविदा सु.क्र.61/2016-17 अन्वये मे.विशाल एंटरप्रायजेस रहाटणी यांचे लघुत्तम दर प्रती नग र.रु.0.99/- प्रमाणे नोटीस छपाई कामी एकुण र.रु.9,30,600/- मध्ये खरेदी करणेस मा.सहाय्यक आयुक्त भांडार यांनी मान्यता दिलेली आहे. मे.विशाल एंटरप्रायजेस रहाटणी यांचेकडील लघुत्तम दर एकुण र.रु.9,30,600/- मध्ये छपाई करुन पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७१ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/२२५/२०१७ दि.५/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मे व्ही.एम.शिंदे, पिंपळे गुरव यांचे कडील बाब क्रं 13 ई-नि.सु.क्र.28/2015-16 अन्वये प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार मनपा सार्वत्रिक निवडणुक 2017 करिता जन जागृतीकामी आवाहन पत्रकांची मनपा नमुन्या प्रमाणे छपाई टप्या टप्याने प्रति शेकडा 95/- प्रमाणे एकुण 14000 शेकडा एकुण र.रु.13,30,000/- मध्ये खरेदी करणेस मा.सहा.आयुक्त भांडार यांचेकडील दि.21/1/2017 व 8/2/2017 रोजीच्या प्रस्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे व्ही.एम.शिंदे, पिंपळे गुरव यांना सार्वत्रिक निवडणुक 2017 करिता जन जागृतीकामी आवाहन पत्रकांची मनपा नमुन्या प्रमाणे छपाईकामी पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७२ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३१/२०१७ दि.१०/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/३७/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.7 च-होली वडमुखवाडी येथे नविन विकसीत होणा-या भागात ठिकठिकाणी पाईपलाईन टाकणेकामी (2016-17) मे.पी.व्ही.देशमुख निविदा रक्कम रू.३२,२१,०४८/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख एकवीस हजार अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा ६.१३% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३१,७४,७७७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७३ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३०/२०१७ दि.१०/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.३/२७/२०१६-१७ अन्वये देहू रस्ता परिसरात वितरण नलिका टाकणेकामी मे. संजय कॉन्ट्रॅक्टर निविदा रक्कम रू.५५,८७,९६०/- (अक्षरी र.रू.पंचावन्न लाख सत्याऐंशी हजार नऊशे साठ फक्त) पेक्षा ५.५०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५५,४४,६५३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७४ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/१७१/१७ दि.११/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील नि.नो.क्र.६६/४/१६-१७ च-होली ७ दाभाडेवस्ती ते च-होली गावठाण ३० मी. डि.पी. रस्ता विकसित करणेकामी मे.अजवानी इंफ्रा.प्रा.ली. नि.र.रु ४,६६,११,१२८/- (अक्षरी र.रू.चार कोटी सहासष्ठ् लाख अकरा हजार एकशे अठ्ठावीस फक्त) पेक्षा १५.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४,१६,००,४३२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक-राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७५ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/३९२/२०१७ दि.८/२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील सध्या कार्यरत असलेले मानधनावरील विविध पदे (नविन) या पदांवर जे कर्मचारी नेमलेले आहेत त्यांची मुदत दि.०६/०२/२०१७ रोजी संपुष्ठात येत असल्याने प्रस्तावासोबतचे प्रपत्रामधील पदांना विशेष बाब म्हणुन दि.७/२/२०१७ रोजी १ दिवस

सेवा खंडीत करुन दि.०८/०२/२०१७ पासुन दि.०७/०४/२०१७ पर्यंत पुढे २ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७६ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/फार्मा/(भां)/कावि/०२८/२०१७ दि.१२/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रूग्णालयास तातडीने आवश्यक औषधे/साहित्याची खरेदी ही, रूग्णालयाचे अंदाजपत्रकातील औषध खरेदी या लेखाशिर्षातुन (र.रू.५०,००,०००/-) व मनपाचे इतर दवाखाने/रूग्णालये यांना तातडीने आवश्यक औषधे/साहित्याची खरेदी ही, मुख्य औषध भांडाराकडील "औषध खरेदी" या लेखाशिर्षातून करणेकामी निविदा क्र.१/२०१६-१७ वाय.सी.एम.रूग्णालय औषध भांडार द्वारे निश्चित झालेल्या मे.कोठारी मेडिकल ॲन्ड सर्जीकल,संत तुकारामनगर, पिंपरी-१८ यांचे समवेत करारनामा व अनामत रक्कम भरणे बाबत एजन्सी धारकास Branded औषधांचे MRP वर १०.६% सुट Generic औषधांचे MRP वर ५४% सुट व सर्जीकल साहित्याचे MRP वर ४५% सुट या दराने दोन वर्षे कालावधी करिता पुरवठा आदेश देणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७७ विषय क्रमांक – २१
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/८२/२०१७ दि.१३/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/६/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.६१ दापोडी मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रू.35,01,401/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख एक हजार चारशे एक फक्त) पेक्षा 10.25% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.32,99,633/-पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७८ विषय क्रमांक – २२
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/८३/२०१७ दि.१७/४/२०१७
विषय - प्रभाग क्र. ६१ दापोडी मुख्य रस्त्याचे कडेने पावसाळी गटरसाठी पाईपलाईन टाकणेबाबत...

विषय क्रमांक २२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७९ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४८३/२०१७ दि.१५/४/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४२/५१/२०१६-१७ प्रभाग क्र.२६ मध्ये जुने डी पी रस्ते विकसित करणेकामी M/s. H.A.Bhosale. नि.र.रु.१८,६७,२७७/- (अक्षरी अठरा लाख सद्सष्ठ हजार दोनशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा १४.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,८२,२३०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८० विषय क्रमांक – २४
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१४५४/२०१७ दि.१८/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५८/१-२०१६-१७ मुंबई पुणे बीआरटीएस रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता व पदपथ यांचे चर पुर्ववत करणेकामी मे.एच.सी.कटारिया नि.र.रु.९३,३५,६३५/- (अक्षरी र.रू.त्र्यान्नव लाख पस्तीस हजार सहाशे पस्तीस फक्त) पेक्षा १४.६०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.८३,७१,२६४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८१ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/१७७/२०१७ दि.१८/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रू.१३५/- कोटी **(**अक्षरी.र.रू.एकशे पस्तीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट, र.रू.८४/-कोटी विविध प्रकारचे पासेस र.रू.२३/- कोटी व बसेस खरेदी र.रू.२८/- कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून प्रतीमाह रक्कम रूपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रू.१.५० कोटी असे एकूण र.रू.७.५० कोटी **(**अक्षरी.र.रू.सात कोटी पन्नास लाख फक्त) माहे एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ अखेर ११ महिने अग्रीम स्वरूपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८२ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भः- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५ब/कावि/२३२/२०१७ दि.१२/४/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागाचे सहा. आरोग्यधिकारी यांस कार्यालयीन कामकाजा करीता वापरात असणारे वाहन क्र.एम.एच.१४ सि.एल.२४९ टाटा सुमो या वाहनांचे टायर ट्युब खरेदी करणेकामी मा.आयुक्त यांच्याकडील आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/९५०/२०१६ दि. २५/१०/२०१६ अन्वये र.रू.२३,७८८/- (अक्षरी र.रू.तेविस हजार सातशे अठ्ठयाऐंशी फक्त) आगावू घेतलेली होती. त्यापैकी र.रू.२३,७८८/- खर्च झाली असुन जादा र.रू.२१२/- (अक्षरी र.रू.दोनशे बारा फक्त) खर्च झाला असुन र.रू.२४,०००/- (अक्षरी र.रू.चौवीस हजार फक्त) इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. सदरचे वाहन क्र.एम.एच.१४ सि.एल.२४९ टाटा सुमो या वाहनांचे टायर ट्युब खरेदी करणेकामी प्रत्यक्ष झालेला एकुण र.रू.२४,०००/- (अक्षरी र.रू.चौवीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८३ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भः- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/४५२/२०१७ दि.२३/४/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र कक्षेका/आ१५/कावि/२९३/१७ दि.२१/०१/२०१७ अन्वये र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख

फक्त) आगावू घेतलेली होती. सदरचे कामकाज मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार थेट पध्दतीने विभागामार्फत रोजाने कर्मचारी लावून व जे.सी.बी.च्या सहाय्याने करणेत आलेले आहे. दि.२७/०१/२०१७ ते ०१/०३/२०१७ अखेर एकूण २०० मनुष्यबळाचा वापर करून र.रू.१,००,०००/- इतका खर्च करणेत आला असून दि.२७/०१/२०१७ ते ०१/०३/२०१७ अखेर एकूण २०० मनुष्यबळावर र.रू.१,००,०००/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदरचा एकूण खर्च र.रू.१,००,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असल्याने पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्रत्यक्ष झालेला एकूण र.रू.१,००,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८४ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१५५/२०१७ दि.१७/४/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाने मागणी केलेनुसार त्यांचे विभागातील Terumo Penpol कंपनीचे प्लॅटलेट एजिटॅटर या उपकरणाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक पार्टस संबंधित उत्पादित कंपनी Terumo Penpol यांचेकडून एकूण र.रु.३२,०६०/- निविदा न मागवता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८५ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१५४/२०१७ दि.१७/४/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन (Sr.No.6999) (HIV +ve) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्ट– Motor for Fluid Pumpएकूण र.रु.१७,३०७/- हा Baxter India Pvt.Ltd .यांचे अधिकृत स्पेअर पार्ट विक्रेते M/S.VEE AAR TECH SOLUTION, New Delhi यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असुन Baxter India Pvt.Ltd यांनी संबंधित मशीन दुरुस्त करुन दिले असल्यामुळे झालेल्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८६ विषय क्रमांक –३०

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – नगरसचिव

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नस/१/कावि/३७०/२०१७ दि.१९/०४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८७ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/१५९/२०१७ दि.१९/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं.३२२/५ पै यासी सि.स.न. ६७७६ पै मधिल १८.०० मी रस्त्याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटा घाटीने मनपाच्या ताब्यात घेणेकामी रस्त्याने बाधित मिळकतधारकांना मा. महापालिका सभा ठराव क्र.७७४, दिनांक २०/११/२०१५ मधिल मान्य धोरणानुसार नुकसान भरपाई अदा करणेकामी येणारा खर्च तसेच प्रस्तावात नमूद खरेदीखत करणेकामी येणारा खर्च जसे स्टॅंप फी, रजिस्ट्रेशन फी, वकिल फी, स्टेशनरी टायपिंग इत्यादी स्वरुपाचा खर्च असा एकुण खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. तसेच सदर रस्त्याची बाधित जागा ताब्यात घेण्यासाठी मा.खाजगी वाटाघाटी समितीच्या बैठकीमधील निर्णयास अधिन राहून नुकसान भरपाई व इतर खर्च अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८८ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग –औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/१/कावि/२१३/२०१७ दि.१३/४/२०१७

विषय – प्रशिक्षणार्थिंना कौशल्य आधारित विशेष प्रशिक्षण देणेकरिता धोरण निश्चित करणेबाबत...

विषय क्रमांक ३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय**–धोरण ठरविताना त्यात स्पष्टता असावी. विषय नीट, स्पष्ट स्वरुपात आणावा. सन्मा.सदस्यांना या विषयाबाबतचे प्रपत्र देणेत यावे. आपणास काय म्हणायचे आहे, किती पैसे द्यावयाचे आहेत, कुणाला द्यायचे आहेत हे स्पष्ट करावे. तसेच कोणत्या प्रायव्हेट संस्था असल्या पाहीजेत, त्या रजिस्टर्ड असल्या पाहीजेत काय, त्याचे ॲफीलिएशन कुठले असले पाहिजे या सगळ्या मुद्यांचा विषयपत्रात समावेश करावा. हे विषयपत्र मागे घेण्यात येवून फेरसादर करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२८९ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/२८/१७ दि.१९/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.44/20/2016-17 अन्वये प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील त्रिवेणीनगर चौक ते गणेशनगर पर्यंत २४ मी.रुंद रस्त्याचे आधुनिकिकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रु.56,01,005/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख एक हजार पाच फक्त) पेक्षा 13.60% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.50,81,232/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३५/२०१७
दिनांक - १२/०५/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.